सोबत मा.राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. रासेयो-२०२५/प्र.क्र.१००/रासेयो कक्ष, दिनांक ०३/१०/२०२५ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सोलापूर व मराठवाडा या भागातील पूरग्रस्त जिल्हातील नागरिकांसाठी मदत संकलित करणेबाबतचे पत्र सोबत जोडले असून सदर पत्राचे अवलोकन करावे.

पृष्ठांकन क्र. तंशिविकाअ/शिक्षण/२०२५/2850
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
दिनांक. 13 OCT 2025

प्रति,

**प्राचार्य**, सर्व व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(मनोज म. अंधारे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

प्रत. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ईमेल व संकेतस्थळावर प्रसिदध करण्याकरिता..

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२५/प्र.क्र.१००/रासेयो कक्ष, दिनांक :-०३ ऑक्टोबर, २०२५

**प्रति,**
**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
सर्व रासेयो संलग्नित कृषि व अकृषि विद्यापीठे/
संचालनालये/अभिमत विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील सोलापूर व मराठवाडा या भागातील पूरग्रस्त जिल्ह्यातील नागरिकांसाठी मदत संकलित करणेबाबत....**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुलक्षून आपणास सुचित करण्यात येते की, सध्या सोलापूर व मराठवाडा विभागात अतिवृष्टीमुळे गंभीर पूरस्थिती निर्माण झाली असून, हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. पुरग्रस्तांना तातडीने मदतीची आवश्यकता आहे. विशेषतः **भांडी, अन्नधान्य, सुके खाद्यपदार्थ, औषधी या आवश्यक जीवनोपयोगी वस्तुंची** मोठ्या प्रमाणावर गरज भासत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना ही समाजाभिमुख व सेवाभावी चळवळ असल्याने, या आपत्कालीन परिस्थितीत आपण सर्व रासेयो संचालकांनी रासेयो स्वयंसेवकांच्या माध्यमातून तातडीने मदत संकलन उपक्रम राबवावा, ही नम्र विनंती आहे.

विद्यापीठनिहाय व आपल्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये पूरग्रस्तांसाठी साहित्य संकलनाचा उपक्रम NSS स्वयंसेवकांमार्फत राबविण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन शिबिर (आव्हान) यामध्ये सहभाग नोंदविला असेल अशा विद्यार्थ्यांचा सहभाग घेवून सर्व संकलित साहित्य आपल्या विभागात जमा करावे. त्याबाबतचा अहवाल राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष, मुंबई या कार्यालयाला दिनांक १० ऑक्टोबर, २०२५पर्यंत कळविण्यात यावा.

आपल्या संवेदनशीलतेवर व सेवाभावी वृत्तीवर पूर्ण विश्वास असून, आपल्या सहकार्यामुळे या संकटग्रस्त कुटुंबांना दिलासा मिळेल.

आपला,

(डॉ.मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना,महाराष्ट्र शासन